नि.दि.दा.क्र.१०९/२०१७
विमलबाई वि. हरिदास
**निशाणी २२ खाली**

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र. ०३ भगवान रामराव शिंदे यांचा शपथेवर उलट तपास प्रतिवादीचे विधीज्ञ ॲड एम. जी. पाटील यांच्यातर्फे सुरु</u>**

४. विष्णु भिका वानखेडे माझे बहिणीचे पती आहेत. हे म्हणणे खरे नाही की, वादी विमलबाई हीचे दुसरे लग्न झालेले आहे. हरिदास सोबत तिचे लग्न तिळसंक्रांतीच्या दिवशी झालेले आहे. मला लग्नाचा दिनांक सांगता येणार नाही. माझी भास्कर जोशीसोबत ओळख नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी भास्कर जोशीचे नाव ऐकलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी शपथपत्र दाखल करतेवेळी वकीलांना भास्कर जोशीचे नाव सांगीतले नव्हते. वादी विमलबाई माझी मेव्हणी आहे. हे म्हणणे खरे आहे की, भोकरदन तालुक्यातील चांदईएको गावात माझे नातेवाईक आहे. त्या गावात माझी मेव्हणी राहते. हे म्हणणे खरे नाही की, माझी मेव्हणी अण्णा सटवा तळेकर याला दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी विमलबाई हीचे लग्न अण्णा सटवा तळेकर सोबत झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी विमलबाई हिचे लग्न झाल्यानंतर माझा तिच्याशी संबंध आला नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादी विमलबाई हीच्या जमीनीचे गट क्रमांक व वाटणीबाबत मला माहीती नाही. हे मला माहित नाही की तिचे दुसरे लग्न झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी विमलबाई मारसावळी येथे राहात नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादी विमलबाई माझी नातेवाईक असल्याने मी तिचे दुसरे लग्न झाले नसल्याचे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटे शपथपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी खोटी साक्ष दिली.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**
श्रवणोत्तर स्विकृत समक्ष

**(धनंजय एस.देवरे)**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, फुलंब्री**
**दि.२५.०१.२०२४**